प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २४.१२.२०२०**

**सिडको अर्बन हाट येथे हिवाळी महोत्सवाचे आयोजन**

या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये कोविड-१९ सुरक्षाविषयक नियमांचे पालन करून दोन प्रदर्शनांचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आल्यानंतर नव वर्षाच्या स्वागतासाठी सिडको अर्बन हाट येथे **०१ जानेवारी २०२१** ते **१२ जानेवारी २०२१** या कालावधीत **सकाळी ११.००** ते **रात्री ०९.००** या वेळेत हिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या दरम्यान अर्बन हाट येथे विकास आयुक्त (हस्तकला) आणि विकास आयुक्त (हातमाग) यांच्या सहकार्याने विविध ९ महोत्सवांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे. दरवर्षी गुजरात सराकारतर्फे अर्बन हाट येथे गुजरात महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. नवीन वर्षातही फेब्रुवारीमध्ये गुजरात महोत्सव प्रस्तावित आहे.

यंदाच्या हिवाळी महोत्सवामध्ये महाराष्ट्र व अन्य राज्यांतील कलाकार आणि कारागीर, विविध स्वयंसहाय्यता गट आणि ट्रायफेड (आदिवासी सहकारी विपणन विकास संघ) सहभागी होणार असून या वेळी बनारसी, रेशमी व सुती साड्या, ड्रेस मटेरिअल हे प्रमुख आकर्षण असणार आहे. तसेच चिकन वर्क ड्रेस मटेरिअल, महिलांसाठी कुर्ते, पुरुषांसाठी खादीचे शर्ट, कोट आणि खादी ड्रेस मटेरिअल ही उत्पादनेही उपलब्ध असणार आहेत. अर्बन हाटच्या निसर्गरम्य परिसरात निसर्ग भ्रमण करण्यासह स्वच्छंदपणे विहरणाऱ्या फुलपाखरांच्या विविध प्रजाती पाहण्याची संधी निसर्ग प्रेमींसाठी उपलब्ध आहे.

अर्बन हाट परिसर स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण असेल याची आयोजकांतर्फे पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. अर्बन हाटचा परिसर खुला असल्याने तसेच तेथे उभारण्यात येणारे स्टॉल आकाराने मोठे असल्याने सामाजिक अंतराच्या नियमाचे पालन करणे शक्य होणार आहे. अर्बन हाटला भेट द्यायला येणाऱ्यांनी मास्कचा वापर करणे बंधनकारक असणार आहे. तसेच प्रवेशद्वारावरच थर्मल स्कॅनिंग व सॅनिटायझर किंवा हॅन्ड वॉशने निर्जुंतुकीकरण केल्यानंतरच आतमध्ये प्रवेश देण्यात येईल. अर्बन हाटला भेट द्यायला येणाऱ्या पर्यटकांनी आपल्याबरोबर ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना आणून नये तसेच सामाजिक अंतराचे पालन करावे, अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

हिवाळी महोत्सवाकरिता थोडेच स्टॉल शिल्लक आहेत. स्टॉल बुक करण्यासाठी व्यवस्थापक, सिडको अर्बन हाट यांच्याशी ९५९४५२११६९ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**